*गुरुमाई चिद्विलासानंद यांच्या शिकवणी*

# उदार बना

*भारतामध्ये सिद्धयोग संघम्‌करिता सत्संग*
*बुधवार, १ एप्रिल, २०२०*

*भगवान नित्यानंद मंदिर*

शुभ रामनवमी. शुभ वसंत नवरात्री. शुभ "Be in the Temple!" हे शीर्षक आहे या सत्संगाचे. आत्म-मंदिर.

आजकाल सर्वांचे घर मंदिर झाले आहे.

मी असे ऐकले आहे की, मुंबईचे सिद्धिविनायक मंदिर बाहेरून बंद आहे; परंतु तेथे पूजा तर होतेच आहे ज्याचे इंटरनेटवरून थेट प्रक्षेपणदेखील होत असते. आणि त्याचा व्हिडिओ पाहून मलाही खूप-खूप आनंद मिळतो. श्री गणेशाय नमः।

हिंदुस्थान माझा देश आहे. जे हिंदुस्थानी असतात ना, ते कुठेही जावोत, जे हिंदुस्थानी हृदय आहे, ते हृदय तर हिंदुस्थानीच असते. शरीर कुठेही असो, हृदय तर हिंदुस्थानाचेच असते. माझ्या मनात असा विचार येतो की, जेव्हा आपण हे जग सोडून वर जातो, आशा आहे की, वर स्वर्गात जातो—आशा तर करूच शकतो!—तर तेथेही आपण कदाचित भगवंताला असेच म्हणत असू की, आम्ही हिंदुस्थानाचे आहोत.

हिंदुस्थानाचा जो रंग आहे ना, तो एकदम कडक आहे. हिंदुस्थानात लोक म्हणतात की, ते कडक चहा पसंत करतात. तर हिंदुस्थानाचा रंगसुद्धा खूपच कडक आहे. असे होऊ शकते की, जेव्हा आपण भगवंताला म्हणू, “आम्ही हिंदुस्थानाचे आहोत. आम्ही हिंदुस्थानाहून आलो आहोत,” तेव्हा त्यालाही

आनंद होत असेल, कारण हिंदुस्थानातच आपण भगवंताच्या वेगवेगळ्या नामांचे गान करतो आणि भगवंताचे वेगवेगळ्या नावांनी पूजन करतो. आपण हेदेखील जाणतो की, आपण कोणत्याही पद्धतीने पूजा करू शकतो आणि भगवंत त्याने प्रसन्न होतोच.

जसे संत कबीरांनी म्हटले आहे, “रामनाम आनंदाने जपा वा आलस्याने रामनाम घ्या, कमीत कमी रामनाम तर घ्या,” कारण भगवंत तर ऐकतोच. आपण जरी सतर्क नसलो, तरी भगवंत सतर्क आहे. आपण खूश नसलो, तरी भगवंत मात्र खूश असतो. आपण दुःखी असू शकतो; पण भगवंत तर सतत आनंदातच असतो. म्हणूनच, *“प्रेम मुदित मन से कहो राम राम राम,”* — ‘प्रेम मुदित मनाने गा राम राम राम,’ वा दुःखी हृदयाने म्हणा राम, राम, राम. रामनाम जप सतत चालू ठेवा.

जे अंतरामध्ये उदित होत आहे, त्याकडे बघायला आजकाल तुम्हा लोकांना खूप वेळ मिळतो आहे ना? जेव्हा मी ऐकले की, भारतामध्ये लॉकडाउन झाला आहे तेव्हा मी कित्येक लोकांना विचारले, “ज्या लोकांचे आपापसात पटत नव्हते, त्यांचे कसे चालले आहे?” कारण आधी जर कोणाशी भांडण झाले, कोणाशी पटले नाही, तर बाहेर पडून कुठेतरी जाता येत होते. लहान मुलेसुद्धा जेव्हा आईबाबांवर रुसतात तेव्हा असेच करतात ना? ते म्हणतात, “ठीक आहे, मग मी इथून कुठेतरी निघून जातो. ठीक आहे, मी निघून जाते. मला तुमची गरज नाही.”

तर मुलांनो! आजकाल काय चालू आहे? मम्मी-पप्पांबरोबर भांडण होते; पण बाहेर जाण्यासाठी सारे दरवाजे बंद आहेत. तर तुमची परिस्थिती काय आहे? लक्षात आहे ना, भारतात आपण म्हणतो, “टेंशन घेऊ नका.” तर त्रास खूप असो, अडचणी खूप असोत, संकटे खूप येवोत; परंतु आपण म्हणू शकतो, “टेंशन घेऊ नका.” टेंशन घेतले तर प्रेम विचारते, “माझ्यासाठी जागा आहे का?” कारण आपण जेव्हा या शरीराला टेंशनने भरून टाकतो तेव्हा मग प्रेम, आनंद, सुख, शांती, या सर्वांसाठी जागाच कुठे उरते? हो ना?

तसे तर तुम्हा लोकांविषयी मी दररोज विचार करत असते. पण आज सकाळी मी तुम्हा सर्वांविषयी जरा जास्तच बारकाईने विचार करत होते. मी म्हटले ना, शरीर कुठेही असो, परंतु हृदय हिंदुस्थानातच आहे. हिंदुस्थान माझा देश आहे.

तर आज सकाळी मी बडे बाबांना प्रार्थना करत होते की तुम्हा सर्वांशी मी काय बोलू? मी अत्यंत लक्षपूर्वक विचार करत होते. भारतामध्ये, साऱ्या दुनियेमध्ये सर्वांना दुःख-यातना तर इतक्या होत आहेत. आजकाल अशी कोणती जागाच उरली नाही जेथे दुःख नाही. जे लोक कायद्याचे पालन करतात, तेही दुःखी आहेत; जे कायद्याचे पालन करत नाहीत, तेही दुःखी आहेत.

मी भारताचा एक व्हिडिओ पाहिला, ज्यात कोणीतरी सायकलवरून चालले होते; तर रस्त्यात दोन पोलिस त्याला पकडून मारायला लागले—जसे इंग्रजीत म्हणतात ना, "My heart sank," माझे हृदय अगदी खचून गेले, म्हणजे माझ्या हृदयावर आघात झाला. मी पाच मिनिटे शांतपणे बसले आणि मी त्या माणसाला माझ्याकडून प्रेम पाठवले, कारण त्याची चूक जरूर असू शकेल; परंतु त्याला कदाचित वाटले असावे की, रस्त्यावर कोणी नाहीच तर काहीही होणार नाही. पण त्याला हे ठाऊकच नव्हते की, तेथे पोलिस आहेत. त्यांनी त्या माणसाला खूप मारले, खूप मारले.

जे लोक कायद्याचे पालन करतात, त्यांपैकी काहींना घर कधीकधी जेलसारखे वाटत असेल त्यामुळे कदाचित ते दुःखी असतील. दुसरीकडे कित्येक लोकांनी मला सांगितले आहे की, ते खूश आहेत. ते काही ना काही काम काढतात, काही ना काही करत राहतात, त्यामुळे ते खूश आहेत, कारण त्यांना वाटते की काहीतरी करत राहणे चांगले असते. आणि असे अनेक लोक आहेत ज्यांच्याजवळ घरदेखील नाही. तर त्यांची काय बरे अवस्था होत असेल?

म्हणून मी म्हणते, की सारे जग अगदी दुःखी आहे. काही काळापूर्वी ऑस्ट्रेलियामध्ये अग्नी एकदम प्रक्षुब्ध झाला होता—मी म्हणते आहे, की अग्नी प्रक्षुब्ध झाला होता—कारण असे नाही की अग्नीला असे करायचे होते, परंतु जे व्हायचे होते ते झाले. मी ऐकले की अब्जावधी, हो अब्जावधी, जीव-जंतू मरून गेले. जेव्हा मी ही बातमी वाचली तेव्हा मला वाटले, “आपण त्यांच्या आत्म्याला शांती कशी देऊ शकू? कशा प्रकारे त्यांनी आपल्या जीवनाची आहुती दिली!”

तेव्हा जीव-जंतूंची ती स्थिती होती, आता माणसांची ही स्थिती झालेली आहे. तर आपण सर्वजण यामध्ये एकत्रितपणे आहोत. ना कोणी राजा आहे, ना कोणी रंक आहे. ना कोणी बुद्धिमान आहे, ना कोणी मूर्ख आहे. जो कोणी आहे, सर्व एकाच परिस्थितीमध्ये आहेत.

आज सकाळी जेव्हा मी बडे बाबांना विचारले, “मी काय बोलू?” तेव्हा त्यांनी मला ही कविता दिली :

आजकाल लोक कामात तर व्यस्त नाहीत,
आजकाल लोक कामात तर व्यस्त नाहीत,

पण मनातल्या मनात खूप त्रस्त आहेत.
पण मनातल्या मनात खूप त्रस्त आहेत.

तसे तर लोक सुस्त नाहीत,
पण ध्यानात खूप मस्त आहेत.
पण ध्यानात खूप मस्त आहेत.
ऐका ना! दिवसभर काम केल्यानंतर सूर्याचा अस्त होऊ शकतो,
दिवसभर काम केल्यानंतर सूर्याचा अस्त होऊ शकतो,
परंतु सुख असो वा दुःख,
आत्म्याची ज्योती सर्वदा उदित आहे.

लक्षात ठेवा, “आत्मा की प्रशान्ति”, आत्म्याची प्रशांती.
प्रेम असो वा क्रोध, लक्षात ठेवा, “आत्मा की प्रशान्ति.”

माहीत आहे, आज १ एप्रिल आहे? सारी दुनिया आज April Fool's Day साजरा करते. आज सकाळी मला वाटले, “ओहो! आज तर April Fool's Day आहे, कदाचित लोकांना वाटेल की, हा एखादा विनोद आहे, वास्तवात गुरुमाईंबरोबर सत्संग होणार नाही.” मला आशा आहे की, तुम्ही असा विचार केला नसेल. मला जे वाटले, ते मी तुमच्यासमोर मोकळेपणाने व्यक्त केले. तुम्ही जाणताच. व्यक्त करण्यासाठी तुमच्याजवळ तर फक्त प्रेमच आहे, हो ना? हो, हे खरे आहे.

आज April Fool's Day आहे तर fool म्हणजे मूर्ख. भारतात तर बस, जी कुठली वस्तू असेल, जो कोणता शब्द असेल, जे काही असेल, त्यासाठी खूप काही म्हटले गेले आहे.

शास्त्रीय ग्रंथांमध्ये मूर्खांबद्दलही खूप काही सांगितले गेले आहे. जो भगवंताचे नाम जपत नाही, तोही मूर्ख आहे; जो थोरामोठ्यांचे म्हणणे ऐकत नाही, तोही मूर्ख आहे; आत्म्याची ज्योती असूनही जो तिचे दर्शन करत नाही, तोही मूर्ख आहे. जेव्हा तुम्ही वाचत असाल, तेव्हा मनात बोचतही असेल, पण काय करावे?

तर मी विचार करत होते, की हा जो शब्द आहे 'मूर्ख', त्याच्यासाठी एक दूसरा शब्द आहे 'मूढ'. इंग्रजीमध्येही एक शब्द आहे—मूड. हा तो नाही. भारतामध्ये आपण म्हणतो ना, "मूड ठीक आहे ना?" "माझा मूड गेला आहे." "आत्ता माझा मूड नाही." नाही, नाही, तो मूड नाही, मी 'मूढ' शब्दाबद्दल बोलते आहे, म्हणजे मूर्ख. जो तुम्हाला माहीतच आहे. जसा हा शब्द माझ्या विचारात आला, तसे शंकराचार्य रचित स्तोत्र, 'भज गोविन्दं' अचानक माझ्या मनात गुणगुणायला लागले.

> सम्प्राप्ते सन्निहिते काले नहि नहि रक्षति डुकृञ्करणे।
> भज गोविन्दं भज गोविन्दं गोविन्दं भज मूढमते॥

> आदि शंकराचार्य म्हणतात, "हे मोहाने ग्रस्त असलेल्या जडबुद्धी, गोविंदाला भज, गोविंदाचे नाव घे, कारण मृत्युसमयी कोणत्याही प्रकारचे पुस्तकी ज्ञान केवळ घोकल्याने तुझे रक्षण होऊ शकत नाही."

> पुढे शंकराचार्य म्हणतात,
> "सत्संगाने वैराग्य प्राप्त होते. वैराग्याने विवेकाची प्राप्ती होते. विवेकाने स्थिर तत्त्वज्ञान प्राप्त होते आणि स्थिर तत्त्वज्ञानाने मोक्षाची प्राप्ती होते, आत्मज्ञान मिळते."

*आत्मा की प्रशान्ति।*

तर भारतात तुम्हाला ठाऊक आहे की April Fool's Day देखील शुभ झाला, कारण तुम्ही 'भज गोविंदं' गाऊ शकता.

भारतामध्ये जुगाडच जुगाड आहे. आपण कोणत्याही गोष्टीला शुभ करू शकतो. तर आजकाल हे जे चालले आहे, त्यालाही आपण शुभ करू शकतो आणि शुभच पसरवू शकतो.

'चित्शक्ती विलास' यामध्ये बाबा मुक्तानंदांनी लिहिले आहे :

श्रीगुरुदेवांना आहे प्रार्थना, सर्वांचे आयुष्य स्वर्गमय होवो।
'मी-माझे' नाहीशी होवो क्षुद्र भावना, हृदयात चितिज्ञानाचा उदय होवो।
सर्व जीवात्मा समता-प्रेमाने नित्य आपली पूजा करोत।
निरंतर आमची प्राणापान-गती 'सोऽहम्' मंत्राचा जप करो॥

माझ्यावर ही कृपा करा, सर्वात्मभावाने मी आपणास पूजावे।
त्यागून जात-पंथ-भाषाभेद मी, मनामध्ये निर्मळतेस धारण करावे।
लहान-मोठे, दुःखी-कष्टी, सज्ञन-मूर्ख यांमध्ये, गुरुनाथ! तुमचेच दर्शन व्हावे।
साधे मन, विनम्र अंतःकरण, विद्यादानी, उदार हृदय मला द्यावे॥

वरदान द्यावे गुरुवर्य! हृदय-मंदिरात सदैव तुमचे ध्यान व्हावे।
सर्वत्र आहे व्याप्त जी ज्योत, सर्वात्मा! तिच्यावर माझा स्नेह जडावा।
हे गुरू! तुमच्यावर कायम भक्ती राहावी, ज्ञान-योग-ध्यानामध्ये दृढ बुद्धी व्हावी।
राहावे सदा मी सिद्धविद्येचा पुजारी, चित्ताचा चितिशक्तीमध्ये प्रवेश व्हावा॥

श्रीराम, कृष्ण, शिव आणि शक्तीचे मी सदैव तुमच्यात दर्शन करावे।
जिथे तुमचा सिद्धयोग विलसतो, त्या गणेशपुरीमध्ये मी वसावे।
देश-भाषा-पंथ-जातिभेदापासून मुक्त करून समता-धर्म द्यावा।
भरावे माझे हृदय नित्यानंद-स्फुरणाने, नित्यानंद-मती माझी व्हावी॥

साधेपणा, खरेपणा, वीरता, शौर्य, नीती आणि तेज सर्वांना प्राप्त होवो।
जगत असावे सर्वांची आनंद-वाटिका, कल्पवृक्ष, कामधेनूने परिपूर्ण असो।
असावेत जितेंद्रिय सिद्धविद्यार्थी, घ्यावा त्यांनी आनंद क्रियायोगामध्ये।
मानव-मंदिरात, हे गुरुनाथ! नित्य दर्शन लाभून तुमचे, मी आत्मतृप्त राहावे॥

जोपर्यंत आहेत घटात प्राण, स्वकर्म-निष्ठा द्यावी, तुमचे अखंड स्मरण व्हावे।
स्वकष्टमय जीवन व्हावे, गुरुनाथ! आपलेच नेहमी ध्यान मी करावे।
इतके तरी अवश्य करा, गुरुदेव! मी सदैव आपणामध्ये एकरूप होऊन राहावे।
पूर्व-पश्चिमेपासून उत्तर-दक्षिणेपर्यंत, नित्य सर्वत्र आपलेच दर्शन करावे॥

आपणच आहात अलख निरंजन, परशिव, सत्-चित्-आनंदरूप।
आपल्यात जगत, जगतात आपण, असे अभेद, अनुपम-अनूप।
मुक्तानंद म्हणतो, श्रीगुरुनाथ! सिद्धविद्या पूर्णपणे फळावी।
क्रियाशील असावे ध्यान आमचे, नीलबिंदूमध्येच विसावावे आम्ही॥

जगतात सदा सुखपूर्ण विहार करावा, हृदयात माझ्या सदैव आपला निवास असावा।
मुक्तानंद म्हणतो, हे गुरुनाथ! आमचे जीवन संविद्‌विलास व्हावे ॥

जेव्हा बाबांनी ही प्रार्थना लिहिली होती, त्या वेळी हे जग वेगळे होते. तरीदेखील, आपण जेव्हा ही प्रार्थना वाचतो तेव्हा असे वाटते की, बाबांनी ही आजच्यासाठी लिहिली आहे. सत्य अजर-अमर असते. जी गोष्ट शास्त्रीय ग्रंथांमध्ये अनेक वर्षांपूर्वी लिहिली गेली होती, ती जेव्हा आपण वाचतो तेव्हा वाटते, त्या ऋषि-मुनींना माहीत होते की भविष्यात, म्हणजे आज आपण कशा प्रकारे जगणार असू! ते मोठे दूरदर्शी होते. पाहा सध्या आपल्यावर काय बेतले आहे! सत्य अजर-अमर असते.

बाबांनी किती सुंदर लिहिले आहे ना! “जगतात सदा सुखपूर्ण विहार करावा.” आजकाल तर आपण बाहेरच्या जगात सुखपूर्ण विहार करू शकत नाही. परंतु सिद्धयोग पथावर आपण अंतर-जगताचा विकास केला आहे म्हणून आपण ह्या अंतर-जगतात विहार करू शकतो.

अशा यातनापूर्ण काळात आपण अधिकच प्रयत्न केला पाहिजे जेणेकरून आपले अंतर-जगत एक सुरक्षित आश्रय-स्थल म्हणून टिकून राहील. जो सुखी आहे, त्याने आपल्याकडचे सुख द्यावे. जो दुःखी आहे, त्याने आपले दुःख त्या प्रियजनांना, त्या सग्यासोयऱ्यांना, त्या जिवलग मित्रांना सांगावे ज्यांच्यामध्ये खऱ्या सहानुभूतीने ऐकण्याचे सामर्थ्य आहे.

ज्यांच्याकडे देण्यासाठी काही आहे, ते त्यांना देऊ शकतात ज्यांच्याकडे काही नाही. आणि ज्यांच्याकडे काही नाही, ते या संकल्पासह घेऊ शकतात की जेव्हा त्यांच्याकडे काहीतरी असेल तेव्हा ते इतरांची मदत करतील. जेव्हा आपण म्हणतो, “जनतेची सेवा म्हणजे जनार्दनाची सेवा आहे,” तेव्हा याचा अर्थ असा नाही की एकाच व्यक्तीने वा एकाच ग्रुपने सर्वांसाठी सारे काही करावे. ज्याच्यापाशी आहे, त्याने दुसऱ्यांना द्यावे. ज्याच्यापाशी नाही, त्याने उदार-हृदय आणि परोपकाराची भावना असणाऱ्या लोकांना ओळखून, संकोच न करता त्यांना आपल्या गरजा सांगाव्यात. आणि मग जेव्हा त्याच्याकडे असेल तेव्हा ते त्याने इतरांना द्यावे. अशा प्रकारे, प्रत्येकाच्या हृदयाला उदारतेचा अनुभव घेण्याचा लाभ मिळतो आणि उदारतेचा हा अनुभव हृदयाच्या स्वास्थ्यासाठी चांगला असतो.

प्रत्येक वर्षी जूनच्या महिन्यात सिद्धयोग पथाच्या वेबसाइटवर तुम्हाला ‘सद्‌गुण वैभव’ वाचायला मिळते. मी असे ऐकले आहे की तुम्ही ते सद्‌गुण लिहून काढले आहेत आणि कित्येक लोकांनी ते कंठस्थही केले आहेत. तेव्हा तुमच्या आतमध्येही सद्‌गुण वैभव आहे आणि तुमच्या जर्नलमध्ये, तुमच्या

नोटबुकमध्येही आहे. या लॉकडाउनमध्ये तुम्ही रोज एक-एक सद्‌गुण वाचू शकता, आत्मसात् करू शकता, आणि लोकांना सांगूही शकता.

मला ही आशा आहे.

माझे हे निवेदन आहे.

तुम्ही ही गोष्ट नक्कीच ऐकाल, हो ना?

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.